**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य



तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.com

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया



**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



**वर्ष ८६ वे) प्रभुतरुण मुंबई, गुरुवार, ता. १६ माहे जून, सन २०११ (अंक ९८३**


*संपादकीय*

## फोटोआल्बम

**-सुहासिनी कीर्तिकर**

हल्ली एक बरं झालंय. मोबाइल नावाच्या छोट्या जादुई कुपीमुळं येता जाता अगदी सहजपणं कितीतरी गोष्टी करता येतात. फोन, एसेमेस, चॅट, कॉमेंट्री ऐकणं हे तर नेहमीचंच. तसं कानाला वायरची चिमुकली गोटी लावून गाणं ऐकणंही नेहमीचंच. खेळ 'टाईमपास' असतातच. साठवलेला आवाज अन् फोटो पहाणं हा विरंगुळा आहेच सोबतीला. म्हणजे एका छोट्या डबीत अबब !; किती किती गोष्टी. कुठं गेले, छाऽऽन वाटलं, किल्क किल्क. काढ फोटो. हलते बोलते फोटो चालताबोलता काढता येतात.

खरंच ना? पण एक आहे हं ! चांगले फोटो काढणं ही एक कलाच आहे. युसुफ कार्शचे कलाकारी असलेले फोटो पाहिलेयेत? अर्नेस्ट हेमिंग्वेचा फोटो, इंदिरा गांधींचा फोटो, आईनस्टाइनचा किंवा सिगारशिवायचा चर्चिलचा कार्शने काढलेला फोटो... पाहिलात तुम्ही? छायाप्रकाशाचा नजरबंदी करणारा अप्रतिम खेळ तिथे दिसतो. उगाच नाही जॉर्ज पेरीनं असं म्हटलंय की, 'जेव्हा प्रसिद्ध व्यक्तींना अमर व्हावंसं वाटतं तेव्हा ते कार्शला बोलावून स्वत:चं पोट्रेट फोटोत काढून घेतात!' 'अंधारातून प्रकाशात येणारं छायाचित्र' कार्शला वेड लावतं. छायाचित्रकाराचा तिसरा डोळा त्यासाठी 'नजरबाज' असावा लागतो. गायकाला जशी संगीतातली नजर असावी लागते तशी छायाचित्रकारालाही. नाहीतरी शब्द, रूप, भाषा तीच असली तरी कलावंताच्या परीसस्पर्शाने त्यांचे स्वरुपच बदलून जाते नेहमी. ओळखीचं चित्र असलं तरी छायाचित्र म्हणून ते सामोरं आलं की त्याची सुंदर कलाकृतीच होऊन जाते.'छायांनी रेखियले चित्र तेच देखणे' बनते मग ते! त्यातून अर्थपूर्ण, कलात्मक अन्वयार्थ निघतो मग. पाहणाऱ्याला आनंद देणारा. पेसी मूर नावाच्या जागतिक पातळीवर गाजलेल्या भारतीय कलावंताचीच काही चित्रं पहा ना ! खिडकीतून कॅमेरा रोखून अंगणात बसलेल्या बोकडाचं फक्त डोकंच त्याने छायांकीत केलं होतं. पण अंधार प्रकाशाच्या मर्मरेषांबरोबर त्यानं या चित्राला शीर्षकही दिलं होतं. संपूर्ण चित्राला अचानक वेगळ्या कलात्मक पातळीवर घेऊन जाणारं! शीर्षक होतं– 'बुद्धीमंत'. ही कलावंताची 'नजर'! त्याचं गाजलेलं असंच आणखी एक छायाचित्र. छाया प्रकाशात रमलेलं एक गोल टेबल. त्यावर वाफही कॅमेऱ्यात बांधून पडलेले दोन चहाचे कप. निवून चाललेले. निवांत खुर्च्यांवर समोरासमोर विसावलेले दोन जीव– एक म्हातारा, एक म्हातारी एकमेकांकडे पाहणारी. सुरकुतल्या डोळ्यांतून हसू सांडणारी, गरम चहा निवत ठेवलेली निवांत अशी; अन् या चित्राचं शीर्षक अफलातून— 'प्रेम'. म्हणजे फोटोग्राफी याने केवळ फोटो नाही; तर अक्षरश: 'ग्राफी'. हस्त कौशल्य आणि 'नजर' असणारी पूर्णाकृती यांचं कलात्मक रसायनं.

असं रसायन असलं की ही चित्रे जीवंत होतात; अमर होतात. पण आपण सामान्य माणसं काही कार्श नव्हे; मूर नव्हेत; गेला बाजार गौतम राजाध्यक्ष किंवा अविनाश

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## The Making of Pratyush

**-Mayura Nayak**

By the time you all read this article, the verdict will surely be out. But it is just the end of May, and as I write, my mental state of mind currently is all jitters thinking about our most awaited event of the year – Pratyush 2011 which will be showcased at Rangsharda Auditorium, Bandra (W) on June 11, 2011. Well the program needs no introduction. Most of us have been a witness to this extravaganza! This is our third consecutive year and I am confident that we shall rock! For the last two years, I have had the pleasure and the privilege to cover the event in Prabhu Tarun and the opportunity to thank everyone on and off the stage for putting up a massive show like this! Since this year, our event is held in the second week of June, we will be covering the event only in July. So that leaves me not much scope to talk about what and how it all happened! So I found an alternative way of covering Pratyush…

Well, for all of you Pratyush is an event which is slated to happen somewhere in June, and I hope you all have booked your tickets! But for US (Pratyush event organizers) it's a journey that began three years back! Journey filled with tears both of joy as well as sadness, excitement, fun, tension, anger, frustration, happiness, pride, overwhelm, bliss and I can just go on. From the day we conceptualized this show, till date, it has been the most unpredictable journey.

Way back in November 2008, we conceptualized an event with dance! All we wanted to do was re-create the magic Prabhu Tarun created some years back in 1997 in Amrut Mahotsav, which was the 75th year of Prabhu Tarun, and the whole year was celebrated with various events. Although we were very young, and barely contributed to the organizing of the show, we were participating in it and loved every moment of the rehearsals. For us 'dance' was all that mattered, most of us were in college and studying in our crucial years, but still would find time to make it on time for rehearsals with loads of dedication. Our then choreographer Mrs. Nandita Dhurandhar did a great job and trained us to perform various dance forms on that stage. The then Editor of Prabhu Tarun Late Mr. Suhas Kothare was indeed successful in getting a bunch of youngsters together to put up a good show, which surely left an indelible impression on young minds like ours! Such great memories, and we were simply looking forward to reviving the same magical moments! All we wanted to do was bring the youth together and provide them a platform that we got years back to showcase their talent, which otherwise gets lost in the competitive world of academics and corporate life! We got a tremendous support from the Prabhu Tarun Board and soon we got going with conceptualizing the program. Mrs. Puja Ajinkya – The director for the first year, and Mr. Vishwas Natekar – The choreographer for the past three years did a fantastic job! We got a remarkable response from the community and could put together almost 70 participants

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

गोवारीकर किंवा मोहन वाघ इत्यादी इत्यादीही नव्हेत. तरीही आपल्याला छायचित्रांचे वेड असते. त्यांचा आल्बम करण्याचा छंद असतो. कारण या रुपाने आपल्याला आयुष्यातील आठवणींचे कवडसे जपायचे असतात. अनेक छोट्यामोठ्या घटनांनी आपलं आयुष्य झगमगत असतं.त्यांना पुन्हा पुन्हा उजाळा देऊन आयुष्य श्रीमंत करण्यासाठी, आनंदाची पुनरावृत्ती करण्यासाठी, ते क्षण ‘फिरुनि पुन्हा’ जगण्यासाठी फोटोआल्बम हा ठेवा असतो. आनंदाची ही ठेव अनेकांबरोबर अनुभवता येते हादेखील केव्हढा मोठा खजिना!

छायाचित्रे बदलती संस्कृतीही जतन करतात. दिवाणखान्याच्या भिंतीवर सॅटीनच्या भरलेल्या रांगत्या बाळाबरोबर अन् भरतकाम करुन द्राक्षांचे घड असलेल्या सजावटीच्या फ्रेमबरोबरीने पूर्वी पूर्वजांचे फोटो असत. छायाचित्राचा हा एक वापर पूर्वजांविषयी आदर राखणारा असे. ही संस्कृती आता बदलली अपरिहार्यपणे. आता प्रत्येक घरटी एक तरी मुलगा परदेशात असतो. मग त्यांचे, त्याच्या मुलांचे, त्याच्या बायकोचे फोटो दिवाणखान्यात आता शोभा आणतात. दूरवरचा जिव्हाळा जपतात. त्यांचा फोटोआल्बम इथल्या आजीआजोबांच्या म्हातारपणच्या वाळवंटात ‘ओयॅसिस’ बनतो. आल्या गेल्याला असे आल्बम दाखवून कौतुकाची श्रीमंती ही मंडळी मिरवतात.

पण ही श्रीमंती नेहमीच असते असं नाही. अनेक वेळा असंही घडतं की येणाऱ्या जाणाऱ्याला असे तऱ्हेतऱ्हेचे आल्बम दाखवून अक्षरशः पीडलं जातं. काश्मिरला गेल्यावर चेहरा झाकणारा काश्मिरी पोशाखातला फोटो ही मंडळी जेव्हा दाखवतात किंवा ‘बर्थडे’ पार्टीत जमलेल्यातले ‘ही पिंकीची जाऊबाई. ही जावेची आई. हा शेजारचा रवी. अत्यंत व्रात्य आहे हं याचा मुलगा’. अशा धावत्या कॉमेट्रीसह दाखवलेल्या त्या फोटोत पाहणाऱ्याला ‘शल्प’ कळत नसतं. असे प्रसंग आलेत ना तुमच्या वाट्याला? आठवून पहा. घरातलं लग्न असते. वर, वधू, वरमाय - करवल्यांच्या वरताण तिथं एक माणूस सर्वत्र संचार करत असतो. फोटोग्राफर! व्हिडोयोची सामग्री, कॅमेरा घेऊन जिथंतिथं तो मिरवतं असतो. लग्नानंतरच्या आवरा-आवरीत अनावर असं एक धूड घरात येऊन पडते. भल्या मोठ्या आल्बमचे. इतकं मोठं की ते धड कपाटात मावत नाही. बघायचे झाले तर मांडीवर नीट बसत नाही. प्रत्येक फोटो बघता बघता जीव अगदी थकून जातो. पण लग्नघरातली कर्ती व्यक्ती न थकता तो आल्बम काढते. तुमच्यासमोर पसरते. सुरू होते मग— फोटोपुराण! विनोदानं म्हणायचं झालं तर समोरच्या व्यक्तीत आलबम भिनत भिनत तो ‘आल्बमिस्ट’ झालेला असतो न् काय!

तरीही फोटो निघतात. आल्बम तयार होतात. ते जपले जातात. याचं कारण म्हणजे ते सचित्र आत्मचरित्रच असतात. काहींनी तर नेटकेपणाने फोटोमागे किंवा फोटोखाली तारीख वार नोंद केलेली असते. क्रमवारी राखलेली असते. संसारी माणसाला अशी आत्मचरित्रं मोलाची ठेव वाटणारच. शिवाय अमूक साली आपण कसे दिसत होतो. आपल्या डोक्यावरचं भरगच्च शिप्तर गळल्यावर कसे दिसतो ते पहाणंही मजेशीर असतं. घरातला भावनिक एकोपा जपण्यासाठी आल्बमचा हळवा कोपरा हवाच असतो. आल्बममुळं जुन्या तारा छेडत मनं जुळतजुळत जातात.

काय मग? आता परीक्षेचे निकाल लागताहेत. आनंदी प्रसंगांचे फोटो काढलेत की नाही? यशस्वी विद्यार्थ्यांचे ‘फोटोजेनिक’ आनंदाने अभिनंदन. अन् ‘प्रत्युष’चे फोटो येतीलच की पुढील अंकी! मनं जुळत जातील तुमची आमची.

पण आता याक्षणी झटका बरं आल्बमवरची धूळ. बसा सारे एकत्र. छायाचित्रांच्या छायेत घराला सुखाचा वारा लागू द्यात. रंगरेषांनी टिपलेले सुखी क्षण पुन्हा एकदा जीवंत होऊ द्यात.

●

## हौशी कला मंदिर
## कॅरम स्पर्धा

हौशी कला मंदिर या संस्थेतर्फे दिनांक २६ जून २०११ (रविवार) रोजी, प्रभुनगर, १२ वा रस्ता खार येथील पाठारे प्रभु को. ऑप, सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्रात ‘‘कॅरम स्पर्धा’’ घेण्यात येतील.

इच्छुकांनी स्पर्धा प्रवेशफी आणि अधिक माहितीसाठी कृपया खालील व्यक्तींशी संपर्क साधावा. तसेच नाव नोंदणी करताना आपले नाव, वय आणि फोननंबर द्यावा. नाव नोंदणीची शेवटची तारीख २२ जून २०११ आहे.

१) हौशी कला मंदिर कार्यालय नं : ६६९२३०३१

२) श्री. रोहील .ज्ञा. जयकर नं: २६७६३७७५

३) श्री. प्रकाश .बा. नायक नं : २६४६४७८४

●

## प्रभुतरुणास देणगी

❖ सौ. मेधा आणि श्री. विठोबा गजानन नायक यांजकडून त्यांच्या विवाहास ५१ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल रु. ५००/-

❖ श्री. रसिक. शि. तळपदे यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ३५०/-

(पान १ कॉलम ४ वरून)

on stage! The community witnessed the first of its kind mega event and everyone associated with the show won accolades for themselves!!!!

The next year, was even tougher as it raised expectations from people. This time we brought in a new director Mr. Satish Joshi, who brilliantly wove a script with various dances and Mr. Natekar again at his best, put up a massive show! Well, the output was sheer brilliance!!! With accolades coming from every corner of the community, it was a very overwhelming moment for us! Because, rising above already high expectation was a tough task, but we sailed through. All this was possible because of a great team that worked persistently to put up such a mega event! And here we are, all set to rock the same stage all over again!

Well the journey so far sounds very good. But behind this journey there is a lot of heartbreak, disappointment, and fear. Is that very shocking to know? Well it may be shocking but, it is true. If you all have noticed I have been referring to ‘US’ as ‘Pratyush event organizers’. These organizers are a part of the ‘Yuva Manch’ committee and have selflessly given their time and have put in efforts to make this show happen. They volunteer for work only because they feel the urge to give something back to the community and by choice put in all the efforts without awaiting any orders from the Prabhu Tarun Board. But some who want to only be called a part of the committee for their vested interest, with time choose to walk away. It is indeed very strange to see success get into people’s heads. It is very unfortunate that some people just need more attention. They start thinking that the accolades are only for and because of them, but the fact will always remain that it’s the team effort that makes it happen. Talent is appreciated when it is exhibited humbly. People play politics on a stage which for us is nothing less than worship; such power seeking people can never garner respect and hence start drifting away from the team’s joint missions. The way a rotten potato spoils the entire basket of potatoes, similarly, they drifting away also leaves their residual negative energy and stench. We as a committee suffered in the bargain, losing many participants to this rotten potato!

Pratyush is all about the people participating in the show. As long as such negative vibes are only restricted to the committee, it is easy to handle. But when it starts trickling down towards the participants, it gets difficult to manage. Participants are ultimately young bloods, who get carried away by the words spoken by some who are all out there to ruin the show. Now you may ask that why would there be anyone who would want to ruin the show? Well we have experienced people whose nuisance value has risen to the hilt only because they have not been able to get the power to rule and the attention they feel they deserve while planning a program like this in spite of working in the committee. I know it sounds absurd and immature, may be it seems even more childish for someone like me to mention it here. This is not because I want to express my woes to you, but this is because we as a team want to appeal to all the participants.

We so eagerly wait every year, for your participation in this show, which provides you a platform to showcase your talent. We were never as lucky to get professional guidance in various art forms and stand on such a massive stage and perform. Here we are bringing it on a platter for you all and the least we want is a little bit of cooperation and support by being there and participating. Now that’s not asking for too much. Don’t wait for your friends to come, as here is where you originally met your friends, so if some don’t come never mind, you will make new friends! It is the art that binds the people together, and with clean intentions and a thirst to learn there will always be scope to find like minded people and grow your network even bigger.

All this may have dampened our spirits but we still have it in us to give this year our best shot! Not for anyone but for those participants who without complaining have always supported us through thick and thin. We started off on setting up a stage for the community and we are continuing our mission. We don’t know how long we can continue, but we are proud of these three years we have slogged it out along with all our participants. So all of you hold your breath, and raise a toast to the best event that could have happened in the history of our community, as we unfold Pratyush 2011. Starring a huge bunch of enthusiastic PPs, drama scripted and directed by Sanjoo Talpade and Bhakti Pradhan Shete, and dances of course choreographed by Vishwas Natekar! We guarantee you a rollicking ride as you experience another extravaganza from our kitty! Looking forward to seeing all of you come and cheer our little, young and old participants. I personally wish to dedicate this year’s Pratyush to all those participants who have stood by us like rocks through all the three years by contributing in their own way and encouraging us to keep coming back with a bang!

●




# ‘हस दे तू!’

## अलबेला

भगवानदादांचा ‘अलबेला’ म्हणजे माझ्या आठवणीच्या कप्प्यातील एक अनमोल ठेवा. या अलबेल्याने त्यावेळी मला पार वेडं केलं होतं. यात ७/८ गाणी आहेत आणि ती सर्वच्या सर्व हीट झाली होती. इतका काळ गेला; पण या अलबेल्याचं गारुड अजूनही मनावरुन उतरत नाही. चित्रपटाची कथा काही खास नव्हती. पण यातील भगवानदादांचा रंबासंबा (जो प्रथमच आपल्याला पाहायला मिळाला), गीताबालीची मोहक अदाकारी आणि सी.रामचंद्रनी दिलेले मौजमस्तीचं संगीत यांनी उच्चांक गाठला. ‘तेरी यादने मारा’, ‘दीवाना परवाना’, ‘बलमा बडा नादान’, ‘शाम ढले खिडकी तले’, ‘भोली सुरत दिल के खोटे’ आणि ती सुप्रसिद्ध लोरी ‘धीरेसे आजा रे अखियनमे’ अशी एकापेक्षा एक सुरस गीतांची मालिका सी. रामचंद्र यांनी आपल्याला दिली. मला सर्वात भावलेलं गाणं म्हणजे ‘ओ बेटाजी’.

प्यारेलाल (भगवानदादा) पैसा मानमरातब मिळवण्यासाठी घराबाहेर पडतो. त्याची गाठ प्रख्यात नटी आशाशी (गीताबाली) पडते. प्यारेलालला काम मिळतं ते आशाच्या किचनमध्ये. पांढरा अेप्रन, डोक्यावर बावर्ची टोपी अशा वेषात प्यारेलाल किचनमध्ये बसलेला असतो. पाठीमागे भांड्यांची रॅक आहे, बाजूला डाईनिंग टेबल आहे. विचारात मग्न असताना हातातील चमचा एका भांड्याला लागून ‘ठण्’ असा आवाज होतो. मग तो दुसऱ्या भांड्यावर आवाज करतो. हळुहळू भांड्यावर ठेका धरतो. भांड्यावरील ठेका, बांगोड्मचा ठेका, रंबासंबा संगीत सुरु होऊन शिगेला पोहचतं आणि एकदम थांबतं. इकडे एक गोष्ट सांगाविशी वाटते. पूर्वीच्या चित्रपटात गाण्याची सुरुवात एका विशिष्ट पद्धतीने केली जायची. सुरवातीला एखादा शेर किंवा दोहा उंच स्वरात पण संथलयीत म्हटला जाई आणि मग मुख्य गीताची सुरुवात व्हायची. इकडेदेखील प्यारेलाल म्हणतो,

कभी काली रतिया, कभी दिन सुहाने
किस्मतकी बाते तो, किस्मतही जाने
ओ...... बेटाजी. अरे ओ बाबूजी
किस्मतकी हवा कभी गरम,कभी नरम
कभी गरम,गरम, कभी नरम,नरम.
कभी गरम नरम गरम नरम. ओ बेटाजी

गीताबाली झोपण्याच्या तयारीत असते. किचनमधील गडबड ऐकून ती कुतुहलाने किचनजवळ येते. मुनीमजी गडबड थांबवण्याच्या उद्देशाने पुढे येतो. पण गीताबाली त्याला थांबवते.

बडी अकडसे बेटा निकले घर से एक्टर होने
वहारे किस्मत... वहारे किस्मत,किस्मत में तो लिखे बरतन धोने
अरे भाई लिखे बरतन धोने... ओ बेटाजी....

भगवान आपल्याच मस्तीत नाचत असतो. आयुष्यात आपण काय करायचं ठरवलं होतं आणि आता आपण काय करतोय? पण या अपयशावर कुढत न बसता तो सर्व मजेत घेत असतो.

दुनियाके इस चिडियाघरमें तरहा तरहा का जलवा
किसीको मिले सुखी रोटी किसीको पूरी हलवा
खिचडीकी हवा कभी गरम, कभी नरम, ओ बेटाजी...

भगवान रॅकवरील एक सॉसपॅन घेऊन त्यात हात फिरवतो. खिचडीची हवा घेतो. नंतर तेच पॅन उलटं फिरवून मॅंडोलीन वाजवण्याचा अविर्भाव करतो. हळूहळू टेम्पो वाढतो.ठेका जलदगतीने चालतो. बाहेर गीताबाली रंगात येऊन नाचत असते. तिची पावलं थिरकतात. रंबासंबा रोमारोमात झिरपतो. आत भगवान बेभान होऊन नाचत असतो आणि शेवटी भांड्याच्या रॅकवर आपटतो. सर्व भांडी अंगावर कोसळतात. डोक्यावर एक भांडं. आजुबाजूला सर्व भांडी आणि त्यात प्यारेलाल हताश होऊन बसलेला पाहून प्रेक्षक टाळ्यांचा कडकडाट करतात. इकडे आशामॅडमदेखील टाळ्या वाजवून प्यारेलालच्या नाचगाण्याचं कौतुक करते. भगवानदा का जवाब नही.

चित्रपट – अलबेला १९५१
संगीत – सी. रामचंद्र
गायक – सी. रामचंद्र.

## कुणीतरी येणार येणार गं!

चित्रपट – अशी ही बनवा बनवी (१९८८)
संगीत – अरुण पौडवाल
स्वर – सचिन, अनुराधा, सुरेश वाडकर, सुहासिनी
पात्रयोजना – अशोक सराफ – धनंजय माने
सचिन – सुधीर (सुधा)
लक्ष्मीकांत बेर्डे – परशुराम (पार्वती)
सुशांत रे – शंतनु
नयनतारा – लीलाबाई काळभोर
निवेदिता – कमला
सुप्रिया – मनिषा (कमला,मनिषा लीलाबाईंच्या भाच्या)

धनंजय आणि सुशांत हे दोघे भाऊ जागेच्या शोधात असतात. बऱ्याच प्रयत्नाने त्यांना लीलाबाई काळभोर या श्रीमंत, खानदानी विधवेच्या मोठ्या बंगल्यात जागा मिळते. तिची एकच अट असते. भाडेकरु लग्न झालेला असावा. मग हे दोघे आपले मित्र सुधीर आणि परशुराम यांना बायकांचा वेष घालून, या आमच्या बायका अशी लीलाबाईंना ओळख करुन देतात. म्हणजे धनंजयची बायको पार्वती (परशुराम) आणि शंतनुची बायको सुधा (सुधीर). एकदा परशुराम विड्या फुंकताना लीलाबाईंची संशयी मोलकरीण पाहते. मग पार्वतीला विड्या फुंकण्याचे डोहाळे लागलेत असा समज करुन दिला जातो. प्रेमळ लीलाबाई पार्वतीचं डोहाळेजेवण घालते.

गाण्याच्या सुरवातीला पडद्यावर पायऱ्या उतरणाऱ्या दोघीजणींचे फक्त पाय दिसतात. एक हिरवी साडी आणि दुसरी पांढरी साडी. हळुहळू संपूर्ण व्यक्ती दिसतात. एक लीलाबाई आणि दुसरी पार्वती. परशुराम म्हणजे लक्ष्मीकांतचा अवतार बघण्यासारखा असतो. हिरवी भरजरी साडी. फुलांचे गजरे मनगटावर, दंडावर बांधलेले. डोक्यावर मुकुट, नाकात नथ एकूण गर्भारणीची वाडी भरलेली असते. लीलाबाई पार्वतीला सांभाळून झोपाळ्यावर बसवते.

लीलाबाई–
चांदण्यात न्यागं हिला, नटवा सजवा, हिला झोपाळे झुलवा
भोवताली बसा तिला काय हवं पुसा, तिचे डोहाळे पुरवा

सुधा डोळ्यासमोर एक मुलांचं चित्र घेऊन उभी असते. प्रथम तिचं तोंड दिसत नाही. सुधाच्या वेषात सुधीर म्हणजे सचिन असतो. सचिनची अदा, त्याचं नाचणं, त्याचे हावभाव सगळं लोभसवाणं आहे. त्याच्या जोडीला कमला आणि मनिषा असतात.

गं कुणीतरी.........गं पारुबाई
गं कुणीतरी येणार येणार गं
पाहुणा घरी येणार येणार गं, घरी येणार येणार गं
गं कुणीतर येणार येणार गं

त्या तिघीजणी म्हणजे सुधा, कमला आणि मनिषा पारुची थट्टा मस्करी करत असतात. त्यावर लक्षा मुरकतो काय,लाजतो काय. मधूनच जीभ चावतो काय. सगळी धमाल असते. मधूनच शंतनू सर्वांचे फोटो काढत असतो.

इवलंसं नाजूक पाऊल बाई
हळूच आतून चाहूल देई
गोविंदा गोपाळ लागे जिवाला तुझा चाळा
हो चाळा, हो चाळा सजीव होणार गं
गं चाळा सजीव होणार गं
गं कुणीतरी येणार गं...

अचानक परशाला नाचण्याची तल्लफ येते. तो बेभानपणे नाचू लागतो. लीलाबाईं नाचणाऱ्या पार्वतीस दम देऊन खाली बसवते. शेवटी त्या तिघीजणी पारुला उठवून मध्ये उभी करतात आणि तिच्याभोवती फेर धरून नाचतात. धनंजय घरी येतो. हा सर्व प्रकार पाहून थंड होतो. कपाळावर हात मारुन खाली बसतो. शंतनू तशा अवस्थेत त्याचा एक फोटो काढतो.

-नंदकुमार विजयकर
nandusuhas03@gmail.com

## पाठारे प्रभु महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १९ ऑगस्ट २०११ रोजी दुपारी ४ वाजता प्रभु सेमिनरी हायस्कूल सभागृहात भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार येथे आयोजित करण्यात आली आहे. सर्व सभासद भगिनींनी उपस्थित रहावे ही विनंती.

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



**YUVA MANCH**

**Together Towards Tomorrow**

**Prabhu Tarun Website :**

A request to all members who have registered for the Prabhu Tarun website to kindly provide their email IDs once again to us.

Due to some technical reasons, the website has not been functional, but we will soon get it up and running. We apologize for the inconvenience caused. We will provide you with new user name and password. Please get in touch soon.

# Choose Your Destiny

**-Prerana Pravin Mankar**

By the time you read this you must be trying to enjoy your last summer vacation as a teenager right before 9th grade or already studying for your 10th grade exams. By now all your relatives around you must have asked you the cliched and inevitable: "So what are your plans for the future?" and the incessant headache must be getting more and more intense. Everybody says you have all the time in the world to decide upon a career/profession/ earning opportunity. Does anybody tell you how fast time runs out for you? Now is the time to actually make a list of things. A sort of SWOT (Strengths, Weaknesses, Opportunities, Threats) analysis of yourself. What are your likes and dislikes; what do you see yourself doing in the long term;what is going to make you happy personally and pocket-wise; in other words what is not going to bore the daylights out of you if you keep doing it day in and day for 90% of your adult life.

I always had an affnity to literature and visual arts. My option for the next big examination (i.e. HSC) was arts. I wanted to write. And the next stepping stone to any kind of writing whether it be creative or professional was the Bachelor's in Mass Media. Of course I always had the option to take up literature, do a B.A. And gradually an M.A. Either within the city or abroad my scope for writing widened with thekind of media exposure this professional course was offering. I could think about writing for a newspaper or a feature writer for magazines or a travelogue or aspire to be a copywriter in a prestigious ad firm or take up public relation and be the public representative of a big company or celebrity or I could write screenplays for flms, short flms, ad flms.

Remember, it doesn't matter what you take up in your HSC; however it is extremely important to do well since every professional course now has a Merit system and if you want to get into the best college for a particular course you will be competing with a lot of a people for one precious seat. So study hard for HSC. Your future literally lies in its outcome.

Even if you don't perform as per your own expectations, it is always good to keep your options open. Don't set yourself up for disappointment if you don't get in. Always plan for an "IF". If you don't get the course and college you want, take up the next best option. For me that option was graduating in Arts with Literature as my major and doing diploma courses side by side from reputed institutes if possible. Then taking up a Masters program within the country in communications or apply abroad and get a professional degree. These options exist even after taking up B.M.M. Since it is equivalent to a B.A.

B.M.M. offers you the choice between majoring in either Journalism or Advertising so the first two years are mostly about exploring both fields and the various subjects involved. The first year is about exploring subjects dealt with in the Arts sector for example: psychology, sociology, economics, literature and so on and so forth. The projects that happen during the first two years are mostly enlightening, grueling and entertaining because they offer you direct exposure to what you will be dealing with in the future. For example under the subject of marketing you will be made to do a project that you may have to emulate when you are the marketing department of a company. This is when you realize that the learning occurs in the practical approach of it and promoting the "Do It yourself" way. It makes you independent.

The two summer vacations however should be spent wisely. I spent mine in internships exploring possibilities for myself since I was still not sure about what I wanted to do. I was torn between being a features writer and being a copywriter for an ad firm. In the middle I also tried my hand at marketing. Try out different avenues for yourself. If you don't enjoy something, it is one thing you can tick off your list. Elimination by trial and error. Getting caught between Journalism and Advertising also seems like an impossible decision for some because neither may hold the actual field of interest, so always pick one closest to your liking and which you believe will guide you in the direction you truly want to go in. For example if you want to get into product packaging and designing, you should take up Advertising as a stepping stone to your post graduation in Design school wherever that may be. If you want to represent a big MNC, be the driving force behind someone's presence in the press, it is advisable to take up Journalism.Each curriculum has been designed to suit the needs of the profession.


If you still haven't found your true calling after graduation, it is time to assess your talents and your genuine interests. I didn't choose either. I had the option of doing an MBA but somehow it wasn't something I was looking for. I wanted to combine my interests and find a middle ground if there was any.In the course, we were introduced to the subjects of Photography and Cinema. Photography was something I was genuinely interested. I even attended a course outside of college for basic knowledge. In the span of 3 years, take up various hobbies. Invest your time purposefully in them. You have lots of time after college hours. One or two hours away from friends won't harm your social scene. This is about identifying your likes and dislikes. Who knows, maybe you might find your true calling in one of them. I know of people who have taken up photography as a full time career and are doing well for themselves. I know of students who have taken up French and are successfully pursuing their dreams of either working in a French company based in India as a liaison or working in France itself.

I didn't want to be left high and dry if I didn't get a college of my choice post the MBA entrances so I decided to give another entrance for the Film & Television Video Production Course at Xavier's Institute of Communication. You have the option of applying abroad as well for similar courses in the U.K. As well as U.S.A. There are more full fedged courses in India at the Film & Television Institute in Pune and the Satyajit Ray Film & Television Institute in Kolkatta. Since they were more time consuming I chose this course for myself. It was an amalgamation of writing, visual art and photography: 3 of my most favorite things in the world. I got sucked in immediately. B.M.M. had also helped me while adapting to the projects and erratic schedules and course timings.

By the end of it we all set out on our own to find our own sense of style; our own sense of self. Film-making is not the easiest thing to take up. People struggle for years before they get a big break in the Film Industry. You have to choose your path. Learn it the hard way or start out on your own without any help.Both paths are diffcult and one must also consider the consent of parents as well. It may be alright to experiment after post graduation for 2 to 3 years. Less pay and more working hours may be tolerated at home only for a limited period of time. If there is no personal growth happening in the course of it stop and re-evaluate before making your next big decision. Each film is a long term commitment and sacrifce of personal life and your own professional satisfaction, unless it is your film. Everybody knows that labour in the Film industry is cheaper than most industries in the country. It is an unfortunately convenient but harsh truth. In such a case a personal five year plan has to be made. If so and so doesn't happen in this much time move on to better pastures. By which I don't mean give it all up – find a middle ground. Your parents will not last you a lifetime and don't let it be too late to make life-changing and career changing decisions. By the end of the day we have to look out for ourselves. Nobody wants to settle for less in life but if some things are not working out in your favor despite several repeated attempts, take a hint. Don't be unrealistic.

I am fortunate to pursue my preferred line of work only thanks to the support of my parents and grandparent and a set of close friends. I have come this far only because of their constant support despite the insecurities and conficts that come our way. I still have a long way to go and so do all of you.

The most important lesson here is to know yourself thoroughly. Only if you are sure of yourself will you be able to go ahead with whatever life plan you have in your head. Be clear in your head and pave the way.The rest will follow. And don't look back to check if you've taken the right step. Don't make any decision that you think you may regret and won't be able to take back. All this sounds too much and too soon but if you start now maybe by the time you are my age life is a breeze and you're living it on your terms without hurdles and unhappiness. And this applies to everyone no matter what line of work you take! It is yourlife. Take charge.



# *Need Financial Assistance for your Higher Education?*

**Saraswat Bank's**

## Saraswati Education Loan Scheme

**will help you achieve your 'Lakshya'**



**Education loan up to :**

**Rs. 10 lakhs*** 
**for education in India**

**Rs. 20 lakhs*** 
**for education abroad**

*Conditions apply

Saraswat Bank

**The Saraswat Co-operative Bank Ltd.** (A Scheduled Bank)

**Corporate Center:** Saraswat Bank Bhavan,
953, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai 400 025.

**Our Customer Service Center (Mumbai): 26464013/19/22**

visit us at www.saraswatbank.com email: customerservicecentre@saraswatbank.com

## अभिनंदन

❖ कु. तनुश्री धीरेन धुरंधर ह्या बालमोहन विद्यामंदिरात शिकणाऱ्या मुलीने सामवाहिनीवर २२ मे ११ रोजी झालेल्या आरोग्यविषयक कार्यक्रमात सहभाग घेऊन दोरीवरील मल्लखांबाचे प्रात्यक्षिक केले.समर्थ व्यायाम मंदिरातर्फे ती सहभागी झाली होती. अभिनंदन.

❖ जयश्री टी. यांना दादा कोंडके स्मृति पुरस्कार डॉ. श्रीराम लागू यांच्या हस्ते बहाल करण्यात आला. अभिनंदन.

❖ साम वाहिनीवर प्रसिद्ध प्रकाशयोजनाकार श्री. शीतल तळपदे यांची मुलाखत घेतली गेली. अभिनंदन.

❖ सौ. उर्वशी धराधर यांच्या सारस्वत बँकेतील उज्ज्वल कारकिर्दीवर लोकसत्तात उर्वशीताईंच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकत लेख प्रसिद्ध झाला

## पाठारे प्रभु सोशल समाज

पा. प्र. सोशल समाजाची १ दिवसीय **वर्षा सहल** रविवार दि. ३-७-११ रोजी नंदनवन रिसॉर्ट, विरार येथे सभासदांसाठी आयोजित केली आहे. प्रत्येकी ५५०/- आकारले जातील.अधिक माहितीसाठी चिटणीसांकडे संपर्क साधावा.

पा.प्र.सोशल समाजातर्फे **अभंगयात्रा** शनिवार दि. १६-७-११ रोजी दुपारी ४ वाजता व्यंकटेश मंदिरात आयोजित केली आहे. तरी सर्वांनी त्याचा अवश्य लाभ घ्यावा असे कार्यकारी समितीतर्फे कळविण्यात येत आहे. इच्छुक गायकांनी अधिक माहितीसाठी चिटणीसांकडे संपर्क साधावा.

पा. प्र. सोशल समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १४-८-११ रोजी सायंकाळी ५ वाजता प्रभु सेमिनरी शाळा सभागृह, भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार, मुंबई ४००००२ येथे घेण्यात येईल. सर्व सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती.

सभेपुढील कामकाज —

१) सूचना परिपत्रकाचे वाचन

२) समाजाच्या रविवार दि. ५-९-१० रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेची टिपणे वाचून मंजूर करणे.

३) समाजाच्या१एप्रिल २०१० ते ३१मार्च २०१० चा कार्यवृत्तांन्त अहवाल वाचून मंजूर करून घेणे.

४) समाजाच्या कार्यकारिणीचा १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११ सालचा जमाखर्चाचा ताळेबंद सादर करणे व मंजूर करून घेणे.

५) स्टेट बँक ऑफ इंडिया या बँके व्यतिरिक्त इतर बँकेत खाते उघडण्याविषयी विश्वस्तांना अधिकार मिळण्याबाबत मंजुरी घेणे.

६) अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळेची येणारी कामे.

विशेष सूचना :- १) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास तीच सभा त्याच ठिकाणी, त्याच दिवशी आधी ठरलेल्या वेळेच्या अर्ध्या तासानंतर (म्हणजे ५।। वाजता) घेण्यात येईल. त्यावेळी गणसंख्येचे बंधन रहाणार नाही.

२) समाजाचा अहवाल व जमाखर्चाचा ताळेबंद शनिवार दिनांक ६-८-११ व रविवार दिनांक ७-८-११ रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत समाजाचे संयुक्त चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर –चंद्रकला, तिसरा मजला, डिलीव्हरी पोस्ट ऑफिससमोर, सातवा रस्ता, खार(प.), मुंबई ४०००५२ येथे पहावयास मिळतील. काही प्रश्न असल्यास बुधवार दिनांक १०-८-११ रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत लेखी स्वरूपात वरील पत्त्यावर देण्यात यावेत.

आपले नम्र,
संयुक्त चिटणीस,
सौ. नीता मिलिंद सौजित
९८२०१६६६२८
आणि
श्री . जयंत बाळकृष्ण कीर्तिकर
९८६७९५८५३५

## पाठारे प्रभू चॅरिटीज

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ५ जून २०११ रोजी सुरेश विठ्ठल स्मृतीसभागृहात चॅरिटीजचे विद्यमान अध्यक्ष श्री. अजित विजयकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सभेच्या सूचनापत्रातील विषयाप्रमाणे सभेचे क्रमवार कामकाज झाले. विश्वस्त श्री . उदय शंकर मानकर यांनी अहवालातील विशेषत्व सारांशरूपाने सांगून चॅरिटीजचे विशेष कार्य अधोरेखित केले. सभेत श्री . सुभाष राव, श्री . अशोक तळपदे आणि प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी प्रसंगोपात्त अशी मनोगते मांडली. त्यात अभिनंदन होते, तक्रारी होत्या, सूचनाही होत्या. विश्वस्त श्री. वीरपाल राणे यांनी तक्रार असलेल्या मुद्यांना सविस्तर उत्तरे दिली. अध्यक्षांनी आभार मानल्यावर सभा समाप्त झाली.


॥ श्री इंद्रायणीप्रसन्न ॥ ॥ श्री गुरुदेव दत्त ॥

**प्रकास्व कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम खाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा!*

*विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबार इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो.*

*खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :

**प्रवीण धुरंधर**

डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.

फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८


**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

# प्रभुतरुणाची डायरी

## बाळा जो जो रे

२९-५-११ सौ. अनुजा आणि श्री. प्रतिक उल्हास अंजिक्य, कन्या, कांदिवली.

## नांदा सौख्यभरे

२९-५-११ श्री. अनिष प्रवीण चंद्रकान्त विजयकर/ कु. स्नेहा अनिल कुलकर्णी (आंतर्ज्ञातीय)

३-६-११ कु. अपर्णा मिलिंद व्यवहारकर/ श्री. प्रभू वालावलकर (आंतर्ज्ञातीय)

## मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ५-६-११ | श्रीम . सुधा (गुलाब) वसंतराव सेंजित, | वय ९५ , | गिरगाव |
| ५-६-११ | सौ . करूणा यशवंत देव, (पूर्वाश्रमीच्या नीला हिरामण देसाई) | वय ७६ , | दादर |
| ६-६-११ | श्री. रमेश गजानन जयकर | वय ६८ | बोरिवली |
| ६-६-११ | श्रीम. कमलिनी विजयकर | वय ८६ | दादर |

## 'मीने ऽ मीने, मीने'

पूर्वाश्रमीच्या नीला देसाई म्हणजेच करूणा यशवंत देव ५ जून रोजी पंचत्वात विलीन झाल्या. नीला किंवा नीलम् किंवा करूणा ही त्यांची बदलती नावे असोत; बदलला नाही त्यांचा नादमधुर किणकिणता आवाज आणि ऋजु स्वभाव ! श्री. वीरपाल राणे यांच्या 'चॅरिटीज'ने आयोजित केलेल्या गौरव समारंभात यशवंत देवांसह त्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्या सोहळ्यात करूणाताईंनी एकाच वेळी ५ वर्षांच्या मुलीचा आवाज, १६ वर्षांच्या मुलीचा आवाज आणि सत्तर वर्षांच्या आजीबाईंचा आवाज देऊन अप्रतिम एकपात्री संवादाची झलक दाखवली होती. वयाच्या सत्तरीत असताना. माझ्या वैयक्तिक आठवणीही आहेत. अखिल भारतीय मराठी महामंडळाचा चार वर्षांपूर्वी भोपाळला वर्धापनदिन होता. यशवंत देव, करूणा देव त्यात असल्याने आम्ही ते चार दिवस एकत्र नांदलो. अरूण दातेंनी करूणाताईची छान मुलाखत घेतली होती. प्रसन्न व्यक्तिमत्व, मनमोकळे बोलणे, अनुभवाची श्रीमंती आणि 'यशवंत' जगणे यांनी त्या लोकांना भरभरून देत होत्या. परतीच्या प्रवासात आम्ही एकत्रच होतो. गप्पांना खळ नव्हता. दादरला उतरल्यावर ( मी आणि उषा तांबे) त्यांना सोडायला घरी गेलो. परत गप्पा.

अगदी अलीकडे दहा महिन्यांपूर्वी 'ऑल इंडिया रेडियो ते आकाशावाणी' नावाचा कार्यक्रम मी साहित्य संघात आयोजित केला होता. साहित्य संघाच्या अनेक नाटकांतून त्यांनी कामे केली असल्याने फोनवर त्या म्हणाल्या, 'सुहासिनी, साहित्य संघ माझं माहेरच आहे. कधीही येईन.' बाळ कुरतडकरांशी (वय वर्षे ९१ - आवाज खणखणीत. आठवण ठणठणीत.) त्यांनी त्या कार्यक्रमात संवाद साधला होता. अपरिहार्यपणे अगदी शेवटी 'पुन्हा प्रपंच' त्या दोघांच्या आवाजात त्यांनी (प्रभाकर जोशींची उणीव नोंदवत) सादर केला. अप्रतिम ! या कार्यक्रमाचं रेकॉर्डिंग नंतर दहाएक जणांनी तरी अंथरूणात खिळलेल्या घरच्या वडिलधाऱ्यांसाठी खास मागून नेलं. आकाशवाणी आणि त्यातलं 'पुन्हा प्रपंच' या वडिलधाऱ्यांसाठी (म्हणजेच मागच्या पिढीसाठी) किती आपुलकी असलेला कार्यक्रम होता ; त्याचं प्रत्यंतर आलं.

करूणा देव गेल्या. ' वाऱ्यावरची वरात' चिदानंदाच्या वाऱ्यावर वाहून गेली. प्रभाकर जोशींही गेले. तरी आपल्या सर्वांच्या मनात 'मिने,मीने ऽ, मीने' ही हाक सततच घुमत रहाणार. त्यांना माझी भावांजली.

पाठोपाठ आकाशवाणीशी, मीनेशी नाते जोडलेल्या निवेदिका कमलिनी विजयकरही गेल्या. त्यांना आदरांजली.

-संपादक

## परीक्षेतील सुयश

**बॅचलर इन टेक्सटाइल (एसएनडीटी विद्यापीठ,पुणे)**

दिप्ती संदीप देसाई ७४.५५ टक्के

**बी. एससी. (होम सायन्स), एसएनडी.टी.**

कु . दीप्ती संदीप देसाई ग्रेड ए, ७५.०९ टक्के

**सीबीएस सी (दहावी)**

श्री . अमरीश रोहित अरूण जयकर AI ग्रेड (९५ टक्केच्या पुढची)